Marathi original

Marathi original

१ : मूक इतिहास

सोव्हिएत कम्युनिस्ट सत्तेचा उदय रशियात १९१७ साली आणि शेवट अधिकृतपणे १९९१च्या डिसेंबरमध्ये झाला. सतरा साली बोल्शेव्हिकांनी क्रांतीचे नेतृत्व करून सत्ता हाती घेतली आणि १९९२ साली श्री० मिखाईल गोर्बाचोव यांच्या जागी आलेल्या श्री० बोरिस येल्तसिन यांनी कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरवला. त्याआधीच सोव्हिएत यूनियनचा अस्त होऊन विविध प्रजासत्ताकांनी आपापले स्वतंत्र अस्तित्व जाहीर केले होते. कम्युनिस्ट पक्षाकडे झारच्या साम्राज्याचा वारसा आला होता. तो येताना पोलंड, बाल्टिक देश इत्यादी विभागांवरील प्रभुत्व सोडावे लागले असले तरी दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळात सोव्हिएत यूनियनने यापैकी बराच प्रदेश पुन्हा आपल्या नियंत्रणाखाली आणला. या स्थितीत सोव्हिएत साम्राज्याचा इतिहास लक्षात घेताना झारशाहीचा इतिहास पाहणे अगत्याचे ठरते आणि झारशाही समजावून घेताना त्याच्याही पूर्वीच्या काही शतकांची दखल घेणे श्रेयस्कर वाटते. मातापित्यांचे काही गुण व अवगुण संततीत उतरतात, तसेच समाजातही होत असते. विद्यमान समाज समजावून घेताना त्याच्या दीर्घकालीन सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक इतिहासाचा शोध उपयोगी पडतो.

सोव्हिएत सत्तेचा उदय १९१७ साली झाला. ज्या रोमनॉव्ह घराण्याची सत्ता क्रांतीने नष्ट केली ती तीनशेएक वर्षे चालली होती. पण रशियाचा ज्ञात इतिहास निदान दोन हजार वर्षांचा आहे. आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी आणि ती ही की, भूगोलाचा समाजावर परिणाम होत असतो आणि भूगोलाने इतिहास बदलतो तसाच इतिहासाने भूगोल बदलतो. तेव्हा रशियाच्या भूगोलाचीही दखल घेणे युक्त ठरेल. रशियन साम्राज्याचे क्षेत्रफळ आठ कोटी दहा लक्ष चौरस मैलांचे होते. म्हणजे सबंध उत्तर अमेरिका खंडाहूनही ते अधिक होते. या भूभागात अनेक नद्या वाहत असतात आणि डोंगर असले तरी ते साधारणत: देशाच्या सीमेलगत आहेत. बहुतेक प्रदेश सपाट आहे. विस्तीर्ण असा हा देश असून मैलोगणती माळरान, तशीच जंगले आहेत. वायव्येकडील भागात 'लाडोगा' आणि 'ओनेगा' ही अतिशय प्रचंड सरोवरे आहेत. युरोपात त्यांच्या तोडीची सरोवरे नाहीत. सैबेरियातील 'बैकल' सरोवरास आशियात तोड नाही. व्होल्गा नदी चोविसशे मैलांची आहे. हा जो भौगोलिक अवाढव्यपणा आहे, विस्तीर्णता आहे त्याचा प्रभाव रशियन मनावर तसेच साहित्यावर पडला तर नवल नाही. टॉल्स्टॉयची *वॉर अँड पीस* असो वा पास्तरनाक यांची *डॉ० झिवागो,* त्यांना माळरान, पठार, बर्फाळ प्रदेश यांची एक अत्यंत भव्य

पार्श्वभूमी लाभली आहे. प्रसिद्ध रशियन चित्रपट-दिग्दर्शक गेरी कोझिन्त्सेव्ह यांनी 'किंग लियर' पडद्यावर आणला असून त्यातील भौगोलिक आणि मानसिक भव्यता अचूक साकार केली आहे. त्यांनी आपल्या या चित्रपटावरील पुस्तकाला *द स्पेस ऑफ ट्रॅजेडी* हे नाव द्यावे हे स्वाभाविक म्हटले पाहिजे.

आर्क्टिक महासागर हा रशियाला लागून आहे, पण बाल्टिक असो वा काळा समुद्र, हे रशियाच्या सीमेनजीक आहेत. कास्पियन समुद्रही असाच सीमेनजीक आहे. रशियात वाळवंटात आढळणाऱ्या हवामानाचा प्रदेश आहे तसाच शून्याच्या कितीतरी खाली हवामान असलेला भूभाग आहे. पहिल्या दर्जाची जमीन साधारणत: दहा लाख चौरस मैलांची होईल. बाकीची जमीन हलक्या प्रतीची असून त्यातीलही काही वाळवंटी प्रदेशातून येणाऱ्या वाऱ्याबरोबर वाळू वाहून आल्याने अधिकच निकृष्ट होते. तथापि या सगळ्याची भरपाई जंगल आणि खनिज संपत्तीने झाली आहे. रशियात प्रचंड प्रमाणावर जंगल आणि सोने, लोखंड, तांबे, कोळसा, प्लॅटिनम आणि तेल यांच्या अनेक समृद्ध खाणी आहेत. युरोप आणि आशिया या दोन खंडांच्या मधोमध रशिया असून अनेकदा त्याचा उल्लेख 'युरेशिया'असा केला जातो. म्हणून रशियन तत्त्वज्ञ आणि राजकीय विश्लेषक प्लेखेनॉव्ह याने म्हटले होते की, रशिया हा आशियाच्या तुलनेत अधिक युरोपीय आहे आणि युरोपच्या तुलनेने कमी युरोपीय आहे. आजही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. रशियाच्या भूप्रदेशापैकी तीनचतुर्थांश भाग आशियात आहे आणि एकचतुर्थांश युरोपात. पण या युरोपीय भागाची लोकसंख्या बाकीच्या प्रदेशातील लोकसंख्येच्या नऊ पटीने अधिक आहे. युरोप आणि आशिया यांच्या मधोमध असल्यामुळे रशियाचा दक्षिणेकडील माळरानाचा (स्टेपी) प्रदेश हा युरोप आणि आशियातून येणाऱ्या आक्रमक टोळ्यांनी अनेकदा युद्धभूमी बनवला. यातून एक लष्करी परंपरा तयार झाली. या परंपरेमुळे, तसेच भौगोलिक आणि राजकीय कारणास्तव स्थलान्तर आणि आक्रमण हे रशियन जीवनाचे कायमचे घटक बनले. परचक्र येणे आणि निरनिराळ्या रशियन राजांनी एकमेकांचा मुलूख पादाक्रान्त करणे, हा रशियाच्या इतिहासातील स्थायिभाव झालेला दिसेल. लोकांचे लोंढेच्या लोंढे वारंवार थडकत असत किंवा दुसरीकडे जात.

क्लीउचेव्हस्की या रशियन इतिहासकाराने रशियाच्या तीन भौगोलिक घटकांचा रशियनांच्या जडणघडणीवर परिणाम झाला असल्याचे म्हटले होते. त्यासंबंधी भाष्य करताना ब्रिटिश इतिहासकार एडवर्ड पेरेस यांनी म्हटले आहे की, माळरानाचा प्रदेश हा सर्वसाधारण हवामान असताना दळवळणासाठी पूर्णत: मोकळा असतो. दूरवर पसरलेले क्षितिज दूरवरची स्वप्ने पाहावयास लावते आणि या काळात लोक सक्रिय जीवन जगत असतात तसेच कायम धोका पत्करत असतात. याच भागात युरोपवर स्वारी करणारांना थोपवणारे बिनीचे खिश्चन तयार झाले, तसेच कोझॅकही तयार झाले. कोझॅक हे लढवय्ये असून ते भटके होते. मजुरी करण्यासाठी वा लढाईसाठी ते सदैव तयार असत. जेथे आपल्याला काही कमाई होईल तेथे ते चढाई करीत. ते पट्टीचे घोडेस्वार होते आणि

व्यापार करत तसेच सैनिक म्हणून काम करत. काही वेळा ते चोऱ्याही करत. निम्म्याहून अधिक रशियन लोकसंख्या जंगलात राहत आली. या जंगलांनी वेगळ्याच प्रवृत्ती तयार केल्या. जंगलात एकट्याने कोयता चालवून साफसफाई करावी आणि जमीन लागवडीस योग्य करावी. सामान्य प्रतीची जमीन आणि प्राथमिक स्वरूपाची साधने यांमुळे सात वर्षांनंतर ती पडीक बनत असे. त्यामुळे स्थलान्तर करणे भाग होते. जंगल सावधानता शिकवत होते. प्रत्येक झाडाच्या मागे धोका होता. याउलट नदीचा भाग. नदीने शांतता आणि व्यापार यांची शिकवण दिली. जलवाहतूक ही शांतता असेल तरच उपयोगाची. यामुळे शांततेचे महत्त्व वाटत असे. तसेच एकंदरच प्रतिकूल हवामानामुळे आणि त्याहीपेक्षा जमिनीचा मगदूर कमी असल्याने लोक सतत स्थलान्तर करत. नद्यांनी लोकांना मोकळेपणा शिकवला.[१]

काळ्या समुद्राच्या उत्तरेपासून पलिकडील माळरानाचा विस्तीर्ण प्रदेश ग्रीक, रोमन आणि बायझंटाइन साम्राज्यांच्या लगत असल्याने त्यांच्या प्रभावाखाली आला. इसवी सनाच्या चार वा पाच शतकांचा या भागाचा इतिहास लिखित स्वरूपात आढळतो. हेरोडोटस हा इतिहासकारांचा महर्षी इसवी सनाच्या पाचव्या शतकात बग नदीच्या काठी असलेल्या आल्बिया या ग्रीक वसाहतीत काही काळ राहिला होता. त्याने आणि इतरांनी जे लिहून ठेवले आहे त्यावरून बग, नीपर या नद्यांच्या खोऱ्यांच्या प्रदेशातील लोक चवथ्या शतकातही शेती करत होते. शेती करून स्थायिक झालेले लोक आणि बाहेरून येणाऱ्या आक्रमक टोळ्या यांच्यात संघर्ष होत असे. शेतीसाठी ते जनावरांचा वापर करत आणि त्याचबरोबर विणकामही त्यांना येत होते. कॉकेशसच्या उत्तरेकडील भागात कुबान खोरे असून तेथील कारागीर तांबे, सोने आणि चांदीचा वापर करत असत असे उत्खननातील वस्तूंवरून म्हणता येते.

सातव्या शतकात काझर लोकांचा उदय झाला. त्यांची एक शाखा सध्याच्या बल्गेरियात गेली आणि दुसरी व्होल्गा आणि कामा नद्यांच्या खोऱ्यात राज्य करू लागली. काझर हे तुर्की भाषा बोलत. त्यांचा अरबांशी उभा दावा होता. अरबांशी टक्कर दिल्यामुळे त्यांनी युरोपात इस्लामचा प्रसार थोपवण्यास मदत केली. ते तसे पाहिले तर टोळी करून राहत; पण त्यांचा व्यापार मोठा होता. यामुळे अनेक लोक आणि देश यांच्याशी त्यांचा संबंध येई. त्यांचे कायदे उदार होते आणि त्यांच्या वागण्यात सहिष्णुता होती. त्यांनी शहरे वसवली आणि यामुळे स्थापत्यकलेला उत्तेजन मिळाले. पगारी सैन्याची योजना राबवणाऱ्या पहिल्या लोकांत त्यांचा समावेश केला जातो. त्यांच्या राज्यात ख्रिश्चन, ज्यू, मुस्लिम असे विविध धर्मांचे लोक होते आणि त्यांना स्वत:चे कायदे अमलात आणण्याची मुभा होती. अशा या कझारिया राज्यात जी संस्कृती वाढत होती तिचा प्रभाव किएव राज्य स्थापन झाले तेव्हा त्यावर पडणे स्वाभाविक होते.

दक्षिण रशियात आलेल्या या विविध लोकांत तुर्की भाषेचा वापर करणारे अनेक होते आणि अगदी विसाव्या शतकातील रशियाच्या इतिहासावर त्याचा परिणाम झाला

असल्याचे काही तज्ज्ञ सांगतात. या संदर्भात अर्चि रूझवेल्ट यांच्या *फॉर द लस्ट ऑफ नोईंग* या पुस्तकातील काही वाक्ये 'फॉरिन अफेयर्स'च्या १९९३ सालच्या उन्हाळी अंकात दिली आहेत ती लक्षात घेण्यासारखी आहेत. रूझवेल्ट म्हणतात : ''रशियाचा बराचसा इतिहास हा सीमेवरील भागात तुर्की आणि स्लाव्ह यांच्यात झालेल्या संघर्षाचा आहे. हजारएक वर्षांपूर्वी रशियन राज्याची स्थापना झाली तेव्हापासून हा संघर्ष होत आला. आपल्या पूर्वेकडील या शेजाऱ्याशी झालेल्या या संघर्षामुळे रशियाचा इतिहासच समजतो असे नव्हे, तर रशियनांची जडणघडण, त्यांचे व्यक्तित्व हेही समजण्यास मदत होते. तुर्की लोकांनी बराच भूप्रदेश व्यापला होता आणि रशियन यात गुंतले होते. रशियाची वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी हे लक्षात घेणे आवश्यक आहे.''

किएव राज्यात राहणारे लोक हे स्किथियन, गोथ वा काझार नव्हते. या सर्वांचा त्यांच्यावर कमीअधिक प्रभाव होता. पण ते वेगळ्या वंशाचे होते. पूर्व स्लाव्ह म्हणून ते ओळखले जात होते. स्लाव्ह हे वित्सुलाच्या खोऱ्यापासून कार्पेथियन डोंगरांच्या उत्तरेकडील प्रदेशात राहत होते. चेकोस्लोव्हाकिया, पोलंड यांतील लोक स्लाव्ह भाषा बोलतात. तिचा ढंग, मोडणी वेगळी आहे. सहाव्या शतकात स्लाव्ह लोक विभागले गेले आणि सातव्यापासून नवव्या शतकापर्यंत काही जण रशियाच्या युरोपीय भागात वस्ती करून राहू लागले. हेच पूर्व स्लाव्ह. रशिया, युक्रेन आणि बेलोरशिया यांत त्यांनी वस्ती केली. चेक, स्लोव्हाक, पोलिश इत्यादी पश्चिम स्लाव्ह आणि क्रोट, स्लोव्हन, मेसेडोनियन हे दक्षिण स्लाव्ह. बहुतेक पूर्वेकडील स्लाव्ह लोकांनी ऑर्थडॉक्स ख्रिश्चन धर्मपंथ स्वीकारला, तर पश्चिमेच्या स्लाव्हनी कॅथलिक. हे स्लाव्ह लोक अगदी प्रारंभी आशिया खंडात राहत होते. नंतर इसवी सनापूर्वी दुसऱ्या-तिसऱ्या शतकात ते पूर्व युरोपात आले. इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकात जर्मनांच्या चढाईमुळे स्लाव्ह पूर्व, पश्चिम आणि दक्षिण अशा दिशांना गेले. यांतील पूर्व स्लाव्ह हे रशियनांचे पूर्वज मानता येतील. सहाव्या, सातव्या शतकातील मॉरिस हा राजा विश्लेषक होता. त्याने आपला अनुभव सांगताना म्हटले आहे की, स्लाव्ह हे नेहमी स्थलान्तर करत असतात. जंगलात वा नदीच्या काठी लहानशा घरात ते राहतात आणि केव्हाही जागा बदलण्याची त्यांची तयारी असते.

प्रोकोपियस या लेखकाने स्लाव्ह हे आपल्या गरजा व अडचणी आपापसात विचारविनिमय करून सोडवतात, त्यांच्यात एकप्रकारची लोकशाही आहे, असे म्हटले होते. सम्राट मॉरिस लिहितो, ''स्लाव्ह लोक स्वातंत्र्याचे भोक्ते आहेत. अनियंत्रित सत्ता ते मान्य करत नाहीत. तसेच त्यांना सहजासहजी शरण आणता येत नाही.'' दुसरा एक सम्राट लिओ याच्या मते स्लाव्ह हे स्वतंत्र लोक असून त्यांना पारतंत्र्य मान्य नाही.[२] (नंतरच्या काळात या स्वतंत्र वृत्तीचे प्रदर्शन झाले नाही आणि अनियंत्रित सत्ता दीर्घ काळ यांनी खपवून घेतली असेच दिसून येईल!) स्वभावाने ते लॅटिन लोकांच्या जवळचे आहेत. उत्साह, भावनात्मकता या बाबतींत ते लॅटिन शोभतात. जर्मनांशी त्यांचे साधर्म्य नाही. भटकी वृत्ती आणि अराजकाकडे कल यांमुळे स्लाव्ह लोकांची संस्कृती तयार आणि

विकसित होण्याच्या मार्गात दीर्घ काळ अडथळे आले. यांचा स्वभाव लवचीक आणि दुसऱ्याचे अनुकरण करण्यास तयार असा असून, रशियन आणि पोलिश लोकांत याचा आढळ विशेषेकरून होतो. यामुळे स्वत: लावलेल्या शोधांपेक्षा इतरांची नक्कल वा पुनरावृत्ती यांवर यांचा भर आहे. पश्चिमेकडील स्लाव्ह लोकांवर रोमचा, तर पूर्वेकडील लोकांवर बायझंटाइनचा प्रभाव पडला.

स्लाव्ह लोकांत पहिल्या प्रतीच्या प्रतिभेचा अभाव होता असे नव्हे. उलट, असेही म्हणता येईल की, वैचारिक क्रांती आणि धर्मसुधारणा या दोन मोहिमा रशियात आल्या नाहीत, पण स्लाव्ह लोकांनीच वैचारिक स्वातंत्र्याचा आग्रह धरल्यामुळे युरोपात हे आंदोलन पसरले. रशियात वैचारिक क्रांती आणि धर्मसुधारणा न होण्याचे एक कारण रेमंड हचिन्सन यांनी दिले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, दोनशे वर्षे तातार लोकांचे रशियावर राज्य होते. त्यांच्यापासून स्वत:चे रक्षण करण्यात रशियनांचा काळ गेला आणि यामुळे वैचारिक क्रांती आणि धर्मसुधारणा यांपासून रशिया वंचित राहिला.[3] कोपर्निकस हा पोलिश आणि गॅलिलिओच्या अगोदरचा. जॉन हस हा लुथरच्या पूर्वीचा आणि धर्मसुधारक. पोलंड आणि बोहेमियांतील स्लाव्हवंशीयांत अनेक जण साहित्य, विज्ञान आणि युद्धकला यांत नाव कमावून होते. संगीतातही त्यांनी आघाडी मारली होती. त्यांच्या गीतांत पश्चिमेकडील लोकांच्या काव्यातील गुण होते.

रशियात स्किथियन आले तेव्हापासून स्लाव्ह वंशाच्या लोकांची वस्ती बरीच होती, असे ताज्या संशोधनावरून म्हणता येते. हे स्लाव्ह कधी गोथ लोकांबरोबर लढत होते, तर कधी हन त्यांना हुसकावून लावीत होते. किएवच्या इतिहासाच्या प्रारंभकाळी ते काझार सत्ताधाऱ्यांना खंडणी देत. काही काळ निरनिराळ्या वंशांच्या लोकांचीही आक्रमणे झाली आणि त्यांनी भूप्रदेश व्यापला असला तरी स्लाव्ह लोकांवर त्याचा अल्प परिणाम झाला. *एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका*तील रशियाविषयक नोंद करणाऱ्या लेखकाने 'हा स्लाव्ह लोकांचा मूक इतिहास' असल्याचे म्हटले आहे. नवव्या शतकाच्या सुमारास या स्लाव्ह लोकांचा आर्थिक आणि सांस्कृतिक विकास झाला होता. शेती, मासेमारी, पशुसंवर्धन, विणकाम, मातीची भांडी तयार करणे, सुतारकाम आणि इतर कलाकुसर यांत ते वाकबगार झाले होते. शहरे वसवण्याची त्यांना हौस होती आणि म्हणून किएव, नोव्हगोरॉड, स्मोलेन्स्क अशी अनेक शहरे त्या काळात वसलेली दिसतात. रशियन आणि सोव्हिएत साम्राज्याचा इतिहास समजावून घेताना या किएव राज्याचे महत्त्व विशेष आहे.

संदर्भ

१ एडवर्ड पेरेस, *ए हिस्टरी ऑफ रशिया*, पृष्ठे ७-९.
२ (संपादक) हेन्री स्मिथ विल्यम्स, *हिस्टोरियन्स हिस्टरी ऑफ द वर्ल्ड*, खंड १७, पृ० ८८.
३ रेमंड हचिन्सन, *सोव्हिएत इकॉनॉमिक डेव्हलपमेंट*, पृष्ठे १०-११.

English translation

English translation

Chapter 1: Silent History

The Soviet communist regime came into power in Russia in 1917 and its rule officially ended in December 1991. In 1917 the Bolsheviks led the revolution and took over the reins of power and in 1992 Boris Yeltsin who had replaced Mikhail Gorbachov declared the Communist Party to be illegal. Even before this the Soviet Union had begun to disintegrate and the different republics had declared their independent existence. The Communist Party had inherited the Czar's empire. Though the Soviet Union had to give up its dominance over Poland, the Baltic States and other such regions during this transfer of power, it had regained control over a large part of this territory in the period following the outbreak of the Second World War. In this situation while considering the history of the Soviet Empire it becomes imperative to take a look at the history of Czardom and in order to study and understand Czardom, it seems creditable to take note of the centuries preceding Czardom. Just as children inherit some of the good and bad qualities of the parents we see a similar process in society. While studying contemporary society it is useful to conduct some research on its long-term cultural, social, political and economic history.

Soviet power emerged in 1917. The reign of power of the Romanov dynasty that was overthrown by the revolution had held sway for almost three hundred years. However, the known history of Russia is not less than two thousand years old. Another factor to note is that just as geography affects society and changes history, history too changes geography. Therefore it would be worthwhile to also take note of the geography of Russia. The land mass of the Russian Empire was spread out over 81,000,000 square miles. This means that it was more than the land mass of the entire North American continent. This land mass was traversed by many rivers and whatever mountains were there were along the borders of this country. Most of the land mass was plain. This country is spread far and wide and consists of miles and miles of Steppes and forests. To the north-west are two immense lakes 'Ladoga' and 'Onega'. There are no lakes in the whole of Europe that can compare with these. There is no lake in the whole of Asia that can compare with 'Baikal' lake in Siberia. The Volga River flows for 2,400 miles. It is not surprising therefore if this geographical enormity and vastness influence the Russian mindscape and Russian literature. Be it Tolstoy's "War and Peace" or Pasternak's "Dr. Zivago" they are set against the grand landscape of the Steppes, the plateau and snow covered regions. The famous Russian film director Grigori Kozintsev while adapting "King Lear" to the screen has been successful in preserving its geographical and psychological grandeur. So it is only natural that he should have named his book about the film as "The Space of Tragedy".

The Arctic Ocean is adjacent to Russia but be it the Baltic Sea or the Black Sea these are close to Russia's borders. Similarly, the Caspian Sea is also close to its borders. While there are some parts of Russia which experience desert like weather conditions there are also territories

which have sub-zero temperatures. There is about 1,000,000 square miles of first grade land. The rest of the land is of a poor quality and part of this becomes even worse due to the sand carried by the winds blowing from desert regions. Yet all this is compensated for by its forests and mineral wealth. Russia has vast forests and several mines rich in gold, iron, copper, coal, platinum and oil. Russia is sandwiched between the continents of Europe and Asia and is often referred to as 'Eurasia'. That is why Russian philosopher and political analyst Plekhanov had said that Russia is more European as compared with Asia and less European when compared to Europe. Today too the situation is not very different. Out of Russia's land mass three-fourths is in Asia and one-fourth is in Europe. However, the population of this European part is nine times as much as the population of the remainder of the provinces. Being situated right in between Europe and Asia, the Steppes to the South of Russia were often converted into a battlefield by the aggressive bands from Europe and Asia. This gave rise to a military tradition. Owing to this tradition along with geographical and political reasons, migration and invasion became permanent features of the Russian way of life. Cyclic invasions and different Russian kings invading each other's territories are seen to have become a permanent feature of Russian history. Hordes of people would suddenly appear from somewhere or migrate to some other place.

The Russian historian Klyuchevsky had said that the three geographical features of Russia had influenced the formation of Russians. Commenting on this the British historian Edward Peres said that the Steppes are entirely free for communication during normal weather conditions. The endless horizon makes people dream of far off places and during this period people are living active lives and taking risks. It was in these parts that the Christians of Binny who stopped people from invading Europe were trained and so also the Kazaks. Kazaks were warriors and nomads. They were always ready to work for wages or wage war. Wherever there was a possibility of earning something they would launch an attack there. They were expert horsemen and traders too. They also worked as soldiers. At times they would even indulge in stealing. More than half of the Russian population lived in the forest. The forests gave rise to very different tendencies. A lone man would clear the forest wielding his sickle and make the land fit for cultivation. But due to the ordinary quality of the land and the elementary implements used the land would be rendered infertile after seven years. Therefore migration was inevitable. The forest taught caution. Danger lurked behind every tree. The land along the banks of the river was just the opposite. The river taught peace and trade. Water transport was of any use only if there was peace. Therefore maintaining peace became important. Also in general, there was constant migration of people due to the unfavorable weather conditions and more so due to the poor quality of the land. Rivers taught the people to be free.[i]

The vast expanse of the Steppes stretching out to the North of the Black Sea being adjacent to the Greek, Roman and Byzantine Empires was influenced by them. The history of this region of the 4th of 5th centuries BC is available in written form. Herodotus, the father of history, had lived for some time in the 5th C BC in Albia, a Greek colony, on the banks of the River Bug. According to accounts written by him and others, people living in the river basins of

the Bug and Dnieper Rivers were involved in farming even in the 4th C. There would be battles between the people who had settled there and were doing farming and aggressive gangs who came from outside. They would use animals for farming and they were also skilled at knitting. From the articles found during excavations it can be surmised that the handicraftsmen living in the Kuban river basin, north of the Caucasus, made use of copper, gold and silver.

In the 7th C the Khazars rose to power. One of their branches moved to present day Bulgaria and the other began to reign in the river basin between the Volga and Kama Rivers. They spoke the Turkic language. They had a longstanding enmity with the Arabs. As they clashed with the Arabs they helped to hold back the spread of Islam in Europe. Although they lived in tribes their trade was quite huge. Therefore they would come in contact with many people and countries. Their laws were liberal and their behavior was tolerant. They built cities and this encouraged the development of architecture. They are counted among the first people to have a policy of maintaining a paid army. Their kingdom consisted of people of different religions like Christians, Jews, Muslims etc. and they were free to execute their own laws. It was only natural therefore that when the Kiev republic was formed it was influenced by this culture that had flourished in Khazaria.

Among the people who entered South Russia there were many who spoke the Turkic language and some experts say that this factor even influenced the history of 20th century Russia. In this context, some sentences from Archie Roosevelt's "For the Lust of Knowing", quoted in the 1993 summer edition of the journal "Foreign Affairs" are noteworthy. Roosevelt says, "Much of Russia's history is about the battles between Turks and Slavs fought in the border regions. This struggle had been going on ever since the establishment of the Russian state about thousand years ago. This struggle with their Eastern neighbor tells us not just the history of Russia but also helps us to understand the temperament and characteristics of Russians. The Turks had spread out over a vast territory and this kept the Russians engaged. In order to understand the objective conditions of Russia it is important to note this fact."

The people living in the state of Kiev were neither Scythian, Goth nor Khazars. They were more of less influenced by these tribes. Yet they were of a different descent. They were known as the Eastern Slavs. Slavs were spread out right from the river basin of Vistula to the territory north of the Carpathian Mountains. The people of Czechoslovakia and Poland both speak the Slav language. The style and flavor are however different. The Slavs got divided in the 6th century and from the 7th to the 9th century some of them settled down in the European part of Russia. These were the Eastern Slavs. They settled down in Russia, Ukraine and Byelorussia. The Czechs, Slovaks, Polish etc. constituted the Western Slavs and the Croatians, Slovenians and the Macedonians made up the Southern Slavs. Most of the Eastern Slavs accepted the orthodox Christian religious sect and the Western Slavs became Catholics. These Slavs lived in the ancient continent of Asia. By the 2nd or 3rd century they had moved to Eastern Europe. In the 5th – 6th century migrated towards the East, West and South due to the German invasion. From among them the Eastern Slavs can be considered as the ancestors of the Russians. King Morris who

ruled in the 6th – 7th century was an analyst. While narrating his experience he has said that the Slavs are always migrating. They live in small houses in the forest or on the banks of the river and are always prepared to migrate.

Procopius, an author had said that the Slavs find solutions to their requirements and problems collectively by discussing them amongst themselves and there seems to be a form of democracy that operates amongst them. King Morris writes, "The Slavs enjoy freedom. They do not acknowledge uncontrolled authority or domination. Also it is not an easy task to subjugate them." According to another emperor, Leo, the Slavs are independent people and they do not accept subordination to anyone. [ii]

(However, eventually it was seen that later they failed to exhibit this aspiration for freedom and gave in to uncontrolled domination for a very long period!) In their characteristics they resemble the Latinos and are enthusiastic and emotional like them. They do not show any likeness to the Germans. Their nomadic characteristic and a tendency towards a chaotic way of life acted as obstacles in the formation and development of their culture for a long time. Their nature is flexible and willing to follow others which are characteristics especially seen in Russian and Polish people. Therefore they stress upon copying or reinventing what others have done rather than depending on their own inventions. The Western Slavs were influenced by Rome while the people from the East were influenced by Byzantine Empire.

It is not as if inspiration of the first order was lacking among the Slavs. Quite to the contrary, one could say that an ideological revolution and religious reform were two campaigns which did not come to Russia but instead it was due to the insistence of the Slavs on the freedom of thought that this movement spread to Europe. Raymond Hutchinson has given one reason for the ideological revolution and religious reform not taking root in Russia. According to him the Tatars ruled over Russia for two hundred years. The Russians had to spend all their time in protecting themselves from these rulers during this period which is why Russia was deprived of an ideological revolution and religious reform. [iii] Copernicus preceded Galileo and was Polish. John Huss was a religious reformer and preceded Luther. Among those of Slav descent in Poland and Bohemia there were many who had earned fame in the fields of Literature, Science and the Art of Warfare. They were leading in Music too. Their songs bore the flavor of poetry of the people from the West.

From recent research it can be concluded that ever since Scythians came to Russia there was a considerable population of people of Slav origin settled there. At times these Slavs had to fight the Goths and at others the Huns would try to drive them out. During the very early period of the history of Kiev they would pay protection money to the Khazar rulers. For some period of time there were invasions by people of different origins and they even occupied the land. Yet this did not affect the Slav people to a great extent. The author writing about Russia in the Encyclopedia Britannica has said that this is the "silent history of the Slav people". The economic and cultural development of these Slav people took place around the 9th century. They

had become skilled in farming, fishing, breeding of animals, knitting, making earthen pottery, carpentry and other crafts. They were enthusiastic about building cities because of which many cities like Kiev, Novgorod and Smolensk are seen to have been established during that period. While studying the history of the Russian and Soviet Empires it is very important to study Kiev.

Ref.

[i] Edward Peres, A History of Russia, pg. 7-9;

[ii] (Editor) Henry Smith Williams, Historians History of the World, Vol.17, pg.88;

[iii] Raymond Hutchinson, Soviet Economic Development, pg. 10-11;